## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १६/२०२०** | **दिनांक २५/०२/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १९/०२/२०२० ते २५/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २६/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून ०१/०३/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/०२ | २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ | २४/०२ | २५/०२ | | २६/०२ | २७/०२ | २८/०२ | २९/०२ | ०१/०३ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २१ | २२ | २१ | २१ | २१ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५३ | ५६ | ५८ | ६५ | ६६ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २२ | २१ | २० | २३ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ७ | ५ | २ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | पू. | पू. | आ. | द. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| ०.० | ०.० | **४२३३.४** |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **फुटवे अवस्था** | • भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. पर्यंत नियंत्रित करावी. |
| **वाल** | **काढणी अवस्था** | • वाल पिकाची काढणी जसजशा शेंगा वाळतील तसतशी शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठववणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावे. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था ते फळधारणा** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे.<br>__टिप:__ फवारणी करताना मोहोर नुकताच फुलत असल्यास आणि फळधारणा झालेली नसल्यास शक्यतो फवारणी फळधारणा होईपर्यंत टाळावी किंवा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास आणि फवारणी करणे गरजेचे असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांचा परागीकरणाचा कालावधी (सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत) वगळून फवारणी करावी.<br>• फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा आकाराच्या अवस्थेत तुडतुड्याचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथी फवारणी (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी. |
| **नारळ** | - | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **केळी** | - | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने केळी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा. |
| **चिकू** | **फुलोरा** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने, चिकू बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **कलिंगड** | **फुलोरा** | • कलिंगड पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यावर फळमाशीच्या नियंत्रणासाठी क्यु ल्युर 'रक्षक' सापळे प्रती हेक्टरी |

| | | |
|---|---|---|
| | | ४ वापरावे. वेळोवेळी कीडग्रस्त फळे जाळून नष्ट करावीत. |
| **भेंडी** | **फुलोरा** | • भेंडी पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किड पिकातील अन्नरस शोषून पिकाच्या विविध भागावर मधासारखा चिकट स्त्राव टाकत असल्याने पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त पाने/ शेंडे नष्ट करावेत तसेच प्रवाही डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकामध्ये पिवळे चिकट कागद सापळे लावावेत. |
| **मोगरा** | **फुल अवस्था** | • मोगरा फुलपिकावरील पर्णकोश अळी, पाने गुंडाळणारी अळी व कळ्या खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त पाने व कळ्या काढून नष्ट कराव्यात व गरजेनुसार ५ टक्के निबोळी अर्काची फवारणी करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**